# फळशास्त्र विभाग

## उद्यानविद्या विद्याशाखा

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

क्र.वि.प्र./ फळ रोप वाटिका/ ९०९ /२०१८          दि. २८/०८/२०१८

**<u>दर पत्रक</u>**

प्रती,

.........................................................

.........................................................

.........................................................

**विषय: फळ झाडांची गुटी कलम बांधणी बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पेरू व डाळिंब या फळ झाडांवर गुटी कलम बांधणी करिता दरपत्रके खालील प्रमाणे या कार्यालयास विहित मुदतीत सादर करावेत

| अ.क्र. | कामाचे विवरण | शेरा |
| --- | --- | --- |
| १ | पेरू या फळ झाडावर गुटी कलम बांधणे (air layering) | पुरविण्यात येणारे दर हे गुटी कलम बांधणी पासून तर पिशवी मध्ये लागवड करणे पर्यंत या अनुषंगाने सादर करावे. |
| २ | डाळिंबा[redacted] फळ झाडावर गुटी कलम बांधणे (air layering) | |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. ३१/८/२०१८ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत.

(सही) २८/८/१८

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

१. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.

२. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'फळ झाडांची गुटी कलम बांधणी बाबत'** असे नमूद करावे तसेच दर पत्रक मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र. वि.प्र./ फळ रोप वाटिका/ 909/२०१८ व दि. 28/०८/२०१८ नमूद करावा.

३. ठेकेदाराने या पूर्वी शासकीय अथवा निमशासकीय कार्यालया मध्ये सदरचे काम केले असल्यास त्या बाबत चे पुराव्यासह प्रमाणपत्र सोबत जोडावे बंधनकारक राहील.

४. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.

५. दर पत्रक मंजूर झाल्या नंतर व कामाचा आदेश देते वेळेस संबधित ठेकेदारास करारनामा लिहून द्यावा लागल तसेच त्या मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

६. करार नाम हा रु.५००/- च्या बॉंड पेपर वर करण्यात येणार व याचा खर्च संबंधीत ठेकेदारास करावा लागेल.

७. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/ स्वीकारणार नाही.

८. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

१०. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.

११. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवसा करिता ग्राह्य धरण्यात येतील.

१२. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.

**१३. गुटी कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) काम पूर्ण झाल्या नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर अदा करण्यात येईल.**

**१४. गुटी कलम बांधणी पासून तर कलम पिशवी मध्ये घेण्या पर्यंतची संपूर्ण जबाबदारी हि संबधित ठेकेदाराची असेल व त्या पैकी ज्या कलमा यशस्वी होतील त्या नंतरच उर्वरित (५०%) रक्कम अदा करण्यात येईल**

१५. यशस्वी झालेल्या कलाम मोजून देण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची असेल.

१६. दर पत्रक मंजूर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१७. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१८. या दर प्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.

१९. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत चे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर कराव्यात.

Sd-

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला